# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ४१ वा ❑ भारतीय सौर दिनांक २९ फाल्गुन शके १९४७, शुक्रवार दि.२० मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## दत्तक मातांना देखील मातृत्व रजा मिळणार....

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

आता मूल दत्तक घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनाही १२ आठवड्यांची (सुमारे ३ महिने) पगारी मातृत्व रजा मिळण्याचा अधिकार आहे सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय देत मुलाच्या वयाची अट रद्द केली असून, कोणत्याही वयाचे मूल दत्तक घेतल्यास ही रजा देण्याचे आदेश दिले आहेत.

यापूर्वी केवळ ३ महिन्यांपेक्षा लहान मूल दत्तक घेतल्यास रजा मिळायची.आता मूल कितीही वयाचे असले तरी आईला रजा मिळेल.मूल दत्तक घेतल्याच्या दिवसापासून १२ आठवड्यांची पगारी रजा घेता येईल.

मातृत्व संरक्षण हा एक मूलभूत मानवी हक्क असून तो मुलाच्या जन्माच्या पद्धतीवर आधारित नाकारला जाऊ शकत नाही असे स्पष्ट मत न्यायमूर्ती जे बी परडीवाला आणि न्यायमूर्ती आर महादेवन यांच्या खंडपीठाने सुनावणी दरम्यान व्यक्त केले सामाजिक सुरक्षा संहितेत यापूर्वी केवळ तीन महिन्याहून कमी वयाच्या बालकाला दत्त घेतल्यास मातृत्व रजेची तरतूद होती मात्र सर्वोच्च न्यायालयाने ही मर्यादा आता असंविधानिक ठरवली आहे सुनावणी दरम्यान सुप्रीम कोर्टाने नमूद केले की पारंपारिक दृष्टिकोनानुसार कुटुंबाच्या व्याख्येत जैविक घटक महत्त्वाचा मानला जात असला तरी दत्तक घेणे हे देखील तितकेच वैध माध्यम आहे. कुटुंबाची व्याख्या केवळ जैविक नात्यांवर मर्यादित नसून ती परस्पर प्रेम ,समज प्रेम आणि जबाबदारीवर आधारित असते. दत्तक घेतलेले मूल आणि जैविक मूल यांच्यात कोणताही कायदेशीर फरक नसल्याचे स्पष्ट करत तीन महिन्यांपेक्षा अधिक वयाच्या मुलाला दत्तक घेणाऱ्या आईची जबाबदारी ही इतर मातांप्रमाणेच असते आणि तिला रजा नाकारणे अन्यायकारक ठरेल असे देखील न्यायालयाने म्हटले आहे.हा निर्णय नोकरी करणाऱ्या दत्तक मातांसाठी एक मोठा दिलासा मानला जात आहे.

कोर्टाने मुलाचे हित सर्वात जास्त महत्वाचे आहे. मोठी मुले खासकरुन ज्यांना संस्थेच्या देखभालीतून दत्तक घेतले जाते त्यांना नव्या कुटुंबात भावनात्मक दृष्ट्या मिसळायला आणि रमायला जास्त वेळ लागतो. सर्वात गरजेची बाब म्हणजे मुलांचे चांगले हित पाहायला हवे. यात नव्या कुटुंबात या मुलांना मिसळण्यासाठी योग्य वेळ देण्याची गरज असल्याकडे कोर्टाने लक्ष वेधले आहे.

सुप्रीम कोर्टाने याचिकेवर दिला निकाल

सुप्रीम कोर्टाचा हा निकाल कर्नाटकचे वकील हमसानंदिनी नंदुरी यांच्या याचिकेवर आला आहे. त्यांनी त्या तरतूदीला आव्हान जे आधी मॅटर्निटी बेनिफिट एक्ट, १९६१ मध्ये होते. आणि नंतर २०२० च्या कोडमध्ये देखील सामील केले गेले होते. त्यांनी या मनमानी आणि भेदभावपूर्ण म्हटले. त्यांच्या याचिकेची सुनावणी वकील बानी दीक्षित यांनी केली होती. त्या म्हटले होते की भारत मुल दत्तक घेण्याचा नियम अपवादात्मक स्थितीतच तीन महिन्यांच्या खाली मुलाला दत्तक घेण्याची परवानगी देतो. त्यामुळे वयाच्या मर्यादेचा हा लाभ बहुतांशी प्रकरणात अन्यायच ठरतो.

सरकारने पितृत्व रजेबाबत धोरण बनवण्याचा विचार करावा

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला हे देखील सांगितले की एक सामाजिक कल्याणाचा उपाय म्हणून पितृत्व रजेबाबत धोरण बनवण्याचा विचार सुरु करावा. कोर्टाने पालकत्वाच्या संदर्भात जास्त लिंग तटस्थ आणि सर्वसमावेशी दृष्टीकोणाच्या गरजेचा संकेत दिला.

# सियावर प्रभूरामचंद्रच्या जयघोषात हिंदू नववर्ष शोभायात्रा उत्साहात !

## रथ, उंट, घोडे, बँडपथक, सनई-चौघडा, सजीव देखाव्यांनी वेधले लक्ष

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - सजवलेला आकर्षक रथ, त्यावर श्रीरामांची भव्य मूर्ती विराजमान. सजीव देखावे, घोडे आणि त्यावर बसलेले मावळे अशा साग्रसंगीत शोभायात्रेने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी गुढीपाडव्यानिमित्त गुरुवारी, १९ रोजी श्रीसंस्थान गणपती मंदिर येथून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. सियावर प्रभूरामचंद्र की जय च्या जयघोषासह सनई-चौघडा आणि टाळ-मृदंगाच्या निनादात शहर परिसर निनादून गेला. पारंपरिक वेशभूषेत नागरिक शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नववर्ष स्वागत समितीतर्फे गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ६ वा. श्रीसंस्थान गणपती मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ झाला. स्वागत समितीचे संस्थापक अध्यक्ष, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, राज्याचे बहुजन विकास मंत्री अतुल सावे, आमदार प्रदीप जैस्वाल, आमदार संजय केणेकर, महापौर समीर राजूरकर, स्वागत समितीचे अध्यक्ष प्रफ ुल्ल मालाणी, शिवसेना उपनेते सुभाष पाटील, सभापती अनिल मकरिये, माजी महापौर नंदकुमार घोडेले, सुदाम सोनवणे, महावीर पाटणी, लक्ष्मीनारायण राठी, संजय कांकरिया, बसैय्ये बंधू, पृथ्वीराज पवार, नगरसेवक सुनिता सोनवणे, पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी, वैशाली कोरडे, सुनिता आऊलवार, सुनीता देव, अनिता मंत्री, दुर्गा भाटी, आशा दातार, रेणुका जोशी, मीरा देशपांडे, सुनीता सोनवणे, सुकन्या भोसले, सुनंदा खरात, प्रतिभा राजपूत, राजश्री राणा, राहुल सोनवणे, श्रीरंग आमटे, ज्ञानेश्वर खर्डे, किशोर शितोळे, कचरू





वेळंजकर, सुरेश कर्डिले, राहुल सोनवणे, राजू वैद्य, नारायण कानकाटे, विजय सूर्यवंशी, जयसिंग होलिये, हिरा सलामपुरे यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते.

या शोभायात्रेत पाथ्रीचे वारकरी मंडळ, कचनेर वारकरी मंडळ, जाधव वाडीतील रामकृष्ण महिला मंडळ, बापूजी मंडळ, पुरोहित मंडळ, स्वरुप संप्रदाय, नरेंद्राचार्य महाराज, आसाराम बापू महाराज, संत रोहिदास महाराज, संत जगनाडे महाराज, इस्कॉन भजनी मंडळ, महिला भजनी मंडळ, अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ, बहुभाषिक महासंघ, हिंदू जनजागृती संघटना, संत गोरोबा महाराज, संत जय सेवालाल आदी संस्थांचाही शोभायात्रेत सहभाग होता.

### राजे, महाराजांचे देखावे, मावळ्यांचा सहभाग

या शोभायात्रेचे मुख्य आकर्षण शिवसेनेचे उपशहरप्रमुख जयसिंग होलिये, शक्तीसिंह होलिये यांनी १० घोडे, दोन उंट आणि शंभर मावळे आणले होते. घोड्यांवर छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, बाल शिवराय, महाराणा प्रताप, बाजीप्रभू देशपांडे आदींची वेशभूषा करीत सजीव देखावे सादर केले. पारंपरिक वेशभूषेत हातात भगवे ध्वज, भाले घेऊन मावळे सहभागी झाले होते. दांडपट्टा चालविणे, तलवारबाजीच्या खेळांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. मागे सजविलेल्या रथावर श्रीरामांची भव्य मूर्ती विराजमान होती. रथामागे दुसऱ्या एका सजवलेल्या रथात राम-लक्ष्मण आणि सीतामाईंचा सजीव देखावा सादर करण्यात आला. त्यानंतर शिव-पार्वतीचा सजीव देखावा होता. वारकरी मंडळाच्या बाल वारकरी, महिलांनी टाळ-मृदंगाच्या तालावर पाऊली खेळत सर्वांचे लक्ष वेधले. मिरवणूक मार्गावर ठिकठिकानी पुष्पवृष्टी करण्यात आली.

### शोभायात्रेचा मार्ग

श्रीसंस्थान गणपती मंदिरापासून निघालेली शोभायात्रा शहागंज येथून सराफा, सिटीचौक, मछली खडक, गुलमंडी, संभाजीपेठमार्गे खडकेश्वर येथील महादेव मंदिराच्या प्रांगणात विसर्जित झाली. खडकेश्वर महादेव मंदिरात नाशिक येथील महामंडलेश्वर शिवगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाने शोभायात्रेचा समारोप झाला.

### पाणी, सरबतचे वाटप

मिरवणूक मार्गावर विविध व्यापारी, संघटनांच्या वतीने पाणी, सरबतची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे मिरवणुकीत सहभागी झालेल्या नागरिकांनी त्याचा लाभ घेतला. मुस्लिम समाजाच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. शोभायात्रेत युवासेना उपसचिव ऋषिकेश खैरे, नगरसेवक सचिन खैरे, संदेश कवडे, वीरभद्र गादगे, अॅड. राजू पहाडिया, किशोर तुळशीबागवाले, विष्णू जाधव, विशाल खंडागळे, अजय चोपडे, हनुमान शिंदे, प्रितेश जैस्वाल, श्रीसंप्रदायचे अॅड. शिवाजी इंजे पाटील, संजय गाडेकर, संभाजी आहेर, शेषराव चव्हाण, सकल मारवाडी समाजाचे दीपक भाटी, भैरुलालजी कच्छवाह, स्वातंत्र्यवीर सावरकरप्रेमी मित्रमंडळाचे किरण सराफ, विजय जहागिरदार, शिवानंद मोघे, विरशैव लिंगायत समाजाचे शिवा खांडखुळे, मनोज टोपीवाला, लालाभाई पारिख, सुभाष मुळे, दिनेश तिवारी, शिवाजी आपरे, विष्णू जाधव, राजेशभाई मेहता, अॅड. जोगेंद्रसिंग चव्हाण, राजेश कोठाळे, रमाकांत जोशी, मिलिंद दामोदरे, धनंजय पांडे आदींसह श्रीसंप्रदाय प्रबोधनकार निर्मला खंडागळे, श्रीसद्गुरु दत्त धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्टचे अखिल अब्बास, मनोज जैस्वाल, राजकमल सार्वजनिक मित्र मंडळाचे जयसिंग होलिये, विश्व हिंदु परिषदेचे सुभाष कुमावत, काशिनाथ दापके, अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे नाईक, सुचिता देशपांडे, कमलेश कस्तुरे, मिलिंद पिंपळे, राहुल औसेकर, दिगंबर जैन, पंचायत समाजाचे ललित पाटणी, विनोद लोहाडे, अग्रवाल दिगंबर जैन मंदिराचे सुधीर सावजी, डॉ. जितेंद्र लोहाडे, सुनील साहुजी, माहेश्वरी समाजाचे शिवप्रसाद तोतला, किशोरलाल चिचाणी, भूषण अग्रवाल, विनयकुमार राठी, संजय सारडा, स्वप्नील बाहेती, राजू मणियार, अनिल बाहेती, सुनील मालाणी, अनंत मोताळे, सुभाष वेदपाठक, शैलेश माकणीकर, श्रीस्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्राचे नंदकुमार कुलकर्णी आदींसह हिंदुत्ववादी संघटनांचे प्रतिनिधी शोभायात्रेत सहभागी झाले होते.

# ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्र ही अनेक संतमहात्म्यांचे पदस्पर्शाने पावन भूमी आहे. श्री गजानन महाराज शेगाव श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर गोंदवले श्री साईबाबा शिर्डी त्याचप्रमाणे स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट हे सर्व ठिकाणे संतांच्या चरणस्पर्शाने पावन झालेले आहेत.

श्री स्वामी समर्थ ज्यांना आपण अक्कलकोट स्वामी महाराज म्हणतो महाराष्ट्रातील अक्कलकोट येथे खूप काळ म्हणजे जवळपास १४ वर्ष त्यांचे वास्तव्य वटवृक्षा खाली होते. श्रीपादवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्या नंतरचे भगवान श्रीदत्तात्रेयांचे ते तिसरे पूर्णा अवतार आहेत, अशी मान्यता आहे. गाणगापूरचे श्री नृसिंह सरस्वती हेच नंतर श्रीस्वामी समर्थांच्या रूपाने प्रकट झाले. ''मी नृसिंह भान असून श्रीशैलम्‌जवळील कर्दळी वनातून आलो आहे'' हे स्वामींच्या तोंडचे उद्गार ते नृसिंह सरस्वतींचा अवतार असल्याचे सुचवतात. विविध ठिकाणी स्वामी विविध नावांनी वावरले.

स्वामी समर्थांचा अवतार हा पंजाब प्रांतात हस्तीनापूर पासून जवळपास २५ ते ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या छेली खेडी नावाच्या गावात वटवृक्षाच्या जवळ गणेश मूर्तीच्या शेजारी झाला . तिथे धरणी दुभंगून एक आठ वर्षाची अतिशय तेजस्वी बालमुर्ती प्रकटली. आणि तेच प्रत्यक्ष परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराज अशी ही आख्यायिका आहे.

श्रीदत्तात्रयांचे तिसरे अवतार म्हणून अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ मानले जातात. आपल्या अवतार समाप्तीच्या वेळी श्रीनृसिंहसरस्वती श्रीशैल्य येथून कर्दळीवनामध्ये गेले. तेथे ते तपश्चर्येला बसले. मध्ये साडेतीनशे वर्षे गेली. त्यांच्याभोवती वारूळ तयार झाले. एकेदिवशी एक लाकूडतोडय़ा लाकूड तोडताना त्याचा घाव चुकला आणि तो वारुळावर पडला. त्या वारूळातून श्रीस्वामी समर्थ प्रकट झाले, असे सांगितले जाते. लाकडे तोडताना कुऱ्हाडीचा घाव वारुळावर बसला व तो श्रीस्वामी समर्थांचे मांडीवर लागून




श्रीस्वामी समर्थ समाधीतून जागे झाले. तो कुऱ्हाडीचा वार त्यांचे मांडीवर स्पष्ट दिसत असे. श्रीस्वामी समर्थ तेथून श्रीकाशीक्षेत्री प्रकट झाले. तेथून गंगाकाठाने कलकत्ता, जगन्नाथपुरी मार्गाने गोदावरी तीरावर आले. प्रथम श्रीस्वामी समर्थ मंगळवेढे ग्रामी प्रकट झाले. ते रानात वास्तव्य करीत. क्वचित गावात येत. गावात एक ब्राह्मण कुटुंब होते. ते श्रीस्वामी महाराज गावात आले की भोजन देत. मंगळवेढे येथील वास्तव्यानंतर श्रीस्वामी समर्थ पंढरपूर, मोहोळ, सोलापूर ह्या ठिकाणी वास्तव्य करून 'श्री' अक्कलकोट येथे आले. चैत्र शुद्ध द्वितीया शके १७७८ रोजी ते अक्कलकोट येथे प्रकट झाले.म्हणजेच गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी. दिवस होता रविवार ६ – ४ – १८५६. त्या वेळी तीन दिवस स्वामींनी अन्नग्रहण केले नव्हते. चोळाप्पा यांनी स्वामींना आपल्या घरी नेले व त्यांना भोजन दिले. त्या वेळेपासून श्री चोळाप्पा स्वामींचे एकनिष्ठ शिष्य झाले. चोळाप्पांचे घरातील मंडळी त्यांना 'एक वेडा घरात आणून ठेवला आहे' असे म्हणत. श्री स्वामींच्या दिव्यत्वाची प्रचिती अक्कलकोट येथील मंडळीस येऊ लागली व लोक स्वामीदर्शनास येऊ लागले. महाराजांनी त्याचे आपल्या भक्तांना अनेक लीला दाखवल्या चमत्कार केले, तसेच उपदेशही केला.

श्री स्वामींची शिकवण म्हणजे त्यांनी वेळोवेळी प्रत्यक्षात कथन केलेल्या सांकेतिक शब्दातून व्यक्त केले आहेत. आत्मसाक्षात्कार करून घेण्यास साधकाला एखाद्या सद्गुरूस शरण जाण्याची गरज आहे. अशा सद्गुरूंची भेट झाल्यावर साधकाने सद्गुरूंच्या स्वरूपाचे निरंतर चिंतन करावे. त्यांची आराधना करावी. त्यांच्या मुखातून निघणारे प्रत्येक अक्षर, हे मंत्रस्वरूप मानून अंत:करणाने ग्रहण करावे. अशी गुरुसेवा केल्याने साक्षात्कार होऊन अंती मोक्षप्राप्ती होते. वाटेल त्याच्या हातचे अन्न ग्रहण करू नये. निरंतर केवळ विषय चिंतन करणाऱ्या स्त्री अगर पुरुषाच्या हातचा विडाही खाल तर तुम्हीही तसेच व्हाल. दुष्ट मनुष्याच्या हातचे अन्न खाल तर, तुम्हीही दुष्ट व्हाल. एक ईश्वरच सर्वत्र भरलेला आहे अशी भावना करा, जेणेकरून तुमचे मन निरंतर पवित्र राहील. परावलंबी नसावे, स्वत: उद्योग करावा व खावे. गांजा केव्हाही ओढू नये, त्याने अपाय होतो. आपल्या धर्माप्रमाणे वागावे व कर्तव्य करावे त्यानेच सर्वत्र विजय प्राप्त होतो. ज्याप्रमाणे बी पेरल्याशिवाय शेत आपण होऊन पीक देत नाही, त्याचप्रमाणे तुम्ही स्वत: कोणतीही ज्ञानपिपासा दाखविल्याशिवाय गुरू आपण होऊन ज्ञानोपदेश देणार नाहीत. साधना करताना ज्या काही सिध्दी प्राप्त होतात, त्यांचा चमत्कार दाखविण्याच्या कामी उपयोग करणे गैर आहे. परमार्थज्ञानाचा उपयोग स्वचरितार्थाचे साधन म्हणून करणे हे अयोग्य आहे.




ईश्वरीय ज्ञानाचा उपदेश करणाऱ्या सर्व धर्म मतांचे व सर्व पंथांचे अंतिम ध्येय एकच असल्यामुळे सर्व धर्म मते व पंथ वंदनीय आहेत. या जगात प्राप्त होणारी सुख-दु:खे, परमात्माच्या इच्छेने घडतात असे मानून त्यांचा स्वीकार करावा. मूर्तिपूजा ही त्याविषयी रहस्य जाणून करावी, केवळ मूर्तिपूजाच करीत राहणे, हेच मनुष्यप्राण्याचे कर्तव्य नाही. परमात्माप्राप्ती हे खरे ध्येय असल्याने उत्तरोत्तर आत्मोन्नती करून घेण्यासाठी प्रयत्नशील असावे.नामाच्या पाठीमागे मी आहे. **(क्रमशः)**